Vol 7 Issue 2 March 2017

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 2 | MARCH - 2017

# ''स्त्रीभ्रूणहत्या आधुनिक काळातील एक ज्वलंत सामाजिक समस्या''

Ku.Gita Vitthal Meshram

*सारांश :–*

भारतीय समाज हा संस्कृतीप्रिय समाज आहे. भारतीय समाजामध्ये विविध जाती पंथाचे व धर्माचे लोक गुणागोविंदाने नांदताना दिसतात. भारताला स्वातंत्र्य मिळून ६9 वर्षे पूर्ण होत आहेत. पण भारतीय स्त्रियांना कोणत्याच प्रकारचे स्वातंत्र्य मिळालेले नाही. आजही स्त्री बंधनात जीवन जगतांना दिसते.

भारतात आज अनेक गंभीर समस्या विराजमान आहेत. ह्यात बालगुन्हेगारी, बेरोजगारी, मद्यपान, भ्रष्टाचार, दारिद्रय, भाववाढ, जागतिक तापमानात वाढ निरक्षरता, एडस्, आतंकवाद, पिण्याच्या पाण्याची समस्या, स्त्रीभ्रूणहत्या इ. समस्यांनी उग्ररूप धारण केले आहे. त्यापैकी अत्यंत महत्त्वाची स्त्री जीवनाला काळीमा फासणारी व कलंक लावणारी समस्या म्हणजे स्त्रीभ्रूणहत्या.

प्राचीन कालखंडापासून ते आजतागायत भारतीय स्त्रीयांच्या वाटयाला दुःख, अपमान, अवहेलना, दुय्यम दर्जाची वागणूक हेच आलेलं आहे. स्वातंत्र्यानंतरही स्त्रियांच्या दर्जामध्ये फारसा फरक पडलेला नाही. आजच्या समाजाने स्त्री जन्मच नाकारला आहे. 'मुलगा वंशाचा दिवा' म्हणून मुलाच्या जन्माला महत्त्व दिले जाते. तर मुलगी म्हणजे कुटुंबावरील ओझे. हुंडयाला काळ असे समजून ती जन्मण्यापूर्वीच तिला मारले जाते. कळी फुलण्याआधीच खुडल्या जात आहे. हे समाजाच्या, देशाच्या दृष्टीने अतिशय घातक आहे. याची जाणीव भविष्यात नक्कीच होईल.

*प्रस्तावना :–*

स्त्री आणि पुरूष ही समाजरथाची दोन चाके आहेत. सुदृढ निरोगी समाजाच्या जडणघडणेसाठी स्त्री–पुरूष प्रमाणात नैसर्गिकरित्या समतोल राखणे आवश्यक आहे. मात्र अलिकडच्या काळात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमाचा चुकीचा वापर करून हा समतोल कृत्रीमरित्या ढासळला जातो आहे.




स्त्रीभ्रूणहत्या सध्या वैश्विक चिंतेचा विषय आहे. कारण जगातील प्रत्येक देशात स्त्री–पुरूष विषमता असलेली दिसते. प्रत्येक जनगणनेनुसार जाहीर होणारे स्त्री–पुरूष प्रमाण केवळ महाराष्ट्राचा किंवा भारताचाच चिंतेचा विषय नसुन जगभराचा चिंतेचा विषय बनला आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार जागतिकस्तरावर स्त्री–पुरूष प्रमाण 98४ इतके आहे. तर जर्मनी, जपान, रशिया, फ्रान्स, यु.के., ब्राझील, दक्षिण आफ्रिका, कोरिया, इराण, चीन, इ. देशात स्त्री–पुरूषाच्या प्रमाणत लक्षणीय घट झाल्याचे दिसून येत.[1] त्याचप्रमाणे भारतात सुद्धा २०११ च्या जनगणना अहवालानुसार दर १000 पुरूषामागे 9४0 स्त्रिया आहेत. तर महाराष्ट्रात हे प्रमाण 925 आहे.[2]

भारतामध्ये वर्तमान समाजव्यवस्थेत स्त्री–पुरूष समानतेचे वारे वाहत असतांना दुसरीकडे आईच्या गर्भातच मुलीला संपवले जात आहे. विज्ञान युग निश्चितच परिवर्तनशील आहे. म्हणून असे म्हटले जाते की, वैज्ञानिक शोधांचा उपयोग चांगला करून घेतला तर विज्ञान हे एक वरदान आहे. परंतु याच वैज्ञानिक शोधांचा दुरूपयोग झाला तर तो अभिशाप ठरते. भारतात सर्वात प्रथम 1975 मध्ये नवी दिल्लीतील 'ऑल इंडिया इन्सिटटयूट ऑफ मेडिकल सायन्स' मध्ये गर्भात शारिरिक व्यंग किंवा इतर काही अडचणी आहेत का? हे पाहण्यासाठी सोनोग्राफी तंत्राचा वापर करण्यात आला होता. हे तंत्र भारतात आले आणि अवघ्या ४ ते ५ वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्र, पंजाब आणि हरियाणामध्ये सोनोग्राफीचा वापर गर्भातील मुलीला मारण्यासाठी होऊ लागला 198४–85 मध्ये सोनोग्राफी तंत्राच्या आधारे भारतात सुमारे 78 हजार स्त्रीभ्रूणांची हत्या करण्यात आली होती. या गंभीर बाबीवर 'टाइम्स ऑफ इंडिया' या वृत्तपत्रामध्ये लेख प्रकाशित करण्यात आला होता.3 सोनोग्राफीच्या या चुकीच्या वापरामुळे भारतातील मुलींची संख्या लक्षणीय कमी होऊ लागल्याचे समाजाच्या निर्देशनास आणण्यात आले होते.

*स्त्रीभ्रूणहत्येंची व्याख्या :–*

1) ''स्त्री गर्भलिंग निदान करून गर्भपात करणे याला स्त्रीभ्रूणहत्या संबोधले जाते''.[4]

2) ''एखादया गर्भवती स्त्रीकडून गर्भधारणेच्या चौदा आठवडयानंतर सोनोग्राफीच्या आधारे गर्भलिंग निदान केल्यावर जर गर्भ स्त्रीलिंगी असेल. तर डॉक्टरांच्या किंवा तत्सम साधनांच्या आधारे नष्ट करण्याच्या कृतीला स्त्रीभ्रूणहत्या म्हणतात''.[5]

3)''गर्भलिंग निदान चाचणीनंतर केली जाणारी स्त्री अर्भकाची हत्या म्हणजे स्त्रीभ्रूणहत्या होय.''

याचाच अर्थ असा की, एखादया स्त्रीला गर्भधारणा झाल्यानंतर सोनाग्राफी किंवा गर्भजलचाचणी माध्यमातून लिंगाचे निदान झाल्यानंतर स्त्रीभ्रूण असल्यास विविध प्रकारच्या वैद्यकीय सोयी जसे. गोळया, औषधे, इंजेक्शन इ. द्वारे गर्भपात करणे व स्त्रीभ्रूणाला जन्माला येण्यापासून वंचित करणे होय.

*शोधनिबंधाचे उद्देश :–*
1) स्त्रीभ्रूणहत्येच्या विविध कारणांचा शोध घेणे
2) स्त्रीभ्रूणहत्येचे सामाजिक परिणाम अभ्यासणे
3) स्त्रीभ्रूणहत्येमुळे भविष्यात निर्माण होणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

*गृहितके :–*
1) स्त्रीभ्रूणहत्येसाठी समाजिक व आर्थिक कारणे जबाबदार आहेत.
2) स्त्रीभ्रूणहत्येचे समाजावर गंभीर परिणाम होतात.
3) स्त्रीभ्रूणहत्येमुळे भविष्यात अनेक समस्या निर्माण होतील.

*संशोधनपद्धती :–*

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम स्त्रोताअंतर्गत उपलब्ध आकडेवारीचा उपयोग केला आहे. तसेच मासीक अहवाल, इंटरनेट, विविध प्रकाशित पुस्तकांचा अवलंब करण्यात आलेला आहे.

*अध्ययनाचे महत्व :–*

विज्ञानाने सोनोग्रॉफी मशीनचा लावलेला शोध हा मनुष्यासाठी एक वरदानच ठरले आहे. माता व जन्माला येणाऱ्या बाळाच्या आरोग्य रक्षणाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे. कारण बाळामध्ये जन्मतः असलेले अनुवांशिक रोग, व्यंग बाळ, मतिमंद मुलांच्या बाबतीत पूर्वसूचना व बाळाची गर्भातील सुव्यवस्थीत वाढ सोनोग्रॉफी यंत्रामुळेच कळते. परंतु सोनाग्राफी तंत्राचा वापर वरील परिक्षणासाठी न करता लिंगनिदानासाठी करून स्त्रीभ्रूणहत्या करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

भारतामध्ये मुलाच्या जन्माचे स्वागत ज्याप्रमाणे केले जाते. त्याप्रमाणे मुलीच्या जन्माचे स्वागत केल्या जात नाही. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा, म्हातारपणाची काठी समजली जाते त्यामुळे मुलाच्या जन्माचा अट्टाहास धरला जातो. मुलगी म्हणजे परक्याचे धन तिच्या लग्नाकरिता द्यावा लागणारा हुंडा, तिची सुरक्षितता या सगळयामुळे मुलीच्या जन्माचा विरोध होते. असेच होत राहिले तर भविष्यात अनेक सामाजिक अडचणी निर्माण होणार आहेत. यासाठी गर्भातील प्रत्येक भ्रूण सुरक्षित राहण्याच्या दृष्टीने समाजजागृती होणे अत्यंत आवश्यक आहे.

*स्त्रीभ्रूणहत्येची कारणे :–*

*१) हुंडा पद्धत :–*

हुंडा देऊ नये, घेऊ नये हे कायदयाने अमान्य केले तरी पुढारलेल्या उच्चप्रशिक्षित प्रतिष्ठित समाजात लग्नाच्या वेळी मुलीकडून मुलाला हुंडा देण्याची प्रथा बिनबोभाट चालत आलेली आहे. भारतामध्ये प्रत्येक 93 मिनिटांनी एका स्त्रीला हुंडयासाठी आपला जीव गमवावा लागतो.[6]

*२) सामाजिक सुरक्षा :–*

हिंदु संस्कृतीत मुलीपेक्षा मुलाच्या जन्माला खूप महत्त्व देण्यात आले आहे. पुत्रप्राप्तीसाठी लोक अंधश्रद्धेच्या आहारी देखील जातात. मुलगा म्हणजे वृद्धापकाळातील सुरक्षा असे समीकरण झाले आहे.

*३) धार्मिक पाठिंबा :–*

रामायण आणि मनुस्मृतीनुसार आदर्श स्त्री तीच जी आज्ञाधारक असते आणि जी नेहमी पुरूषांची काळजी घेते. हिंदू धर्मात अंतिम संस्कार पूर्ण करण्यासाठी मुलागाच लागतो. अन्यथा मृत व्यक्तीला मोक्षप्राप्ती मिळत नाही.

*४) छोटे कुटुंब :–*

शासनाचा कुटुंबनियोजनाचा दंडक व आर्थिक परिस्थिती किंवा अन्य कारणांमुळे आज कुटूंबातील व्यक्तीची संख्या मर्यादित ठेवण्याकडे लोकांचा कल आहे. हम दो हमारे दो चा भावनेतूनच दोनच मुलांचा आग्रह कुटुंबीयांचा असतो. कुटुंब मर्यादीत ठेवण्याच्या व मुलाच्या अपेक्षेपोटी स्त्रीभ्रूणहत्या घडून येते.

*५) सोनोग्रॉफीचा वाढता प्रभाव :–*

आधुनिक युगात तंत्रज्ञानात प्रचंड वेगाने प्रगती झाली आहे. अल्ट्रा सोनाग्राफी यंत्राच्या साहाय्याने लिंगनिदान करून मुलगी असल्यास तिला गर्भातच मारून टाकले जाते.

*६) पारंपारिक विचारसणी :–*

भारतीय समाज हा पुरूषकेंद्रीत पितृसत्ताक कुटूंब पद्धतीचा असल्यामुळे पुरूष हाच कुटुंबाचा प्रमुख असतो. त्यामुळे मुलगा हा वंशाचा दिवा काठीचा आधार, आपला वंश पुढे चालवणारा अशी पारंपारिक विचारसरणी समाजात प्रचलीत असल्यामुळे मुलींना दुय्यमस्थान देवून तिचा गर्भपात केला जातो.

*स्त्रीभ्रूणहत्येचे दुष्परिणाम :–*

*१) स्त्री–पुरूष असमतोल :–*

स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण वाढल्यामुळे स्त्रीयांच्या संख्येत प्रचंड घट होऊ लागली आहे. पुरूषांचे प्रमाण हे जास्त व उलट स्त्रीयांचे प्रमाण हे अत्यल्प असा स्त्री–पुरूष असमतोल निर्माण झाला आहे. लिंग गुणोत्तर विषमता निर्माण झाली आहे.

*२) बहुपतीत्व प्रथेचा उदय :–*

समाजातील स्त्रीयांचे प्रमाण कमी झाल्यास पाच भावामध्ये एकच पत्नी अशी अवस्था निर्माण होईल. एका स्त्रीस अनेक पती असतील. म्हणजेच बहुपतीत्वाची पद्धत रूढ होईल. पाच पांडवात एकच दौप्रदी अशी अवस्था निर्माण होईल.

*३) विकृतीत वाढ :–*

प्रत्येक पुरूषाला विवाहाकरिता स्त्रीची आवश्यकता असते. योग्यवेळी पत्नी मिळाली नाहीतर निराशा येईल व विकृतीत वाढ होईल.

*४) स्त्रियांवरील अत्यांचारात वाढ होईल :–*

मुलींची संख्या कमी झाल्यास बलवान पुरूष स्त्रियांवर अत्याचार करतील. संयुक्त राष्ट्रसंघाची आकडेवारी सांगते की, जगात प्रत्येक ६

मिनिटाला एक बलात्कार होतो.[7] हे प्रमाण वाढून स्त्रियांचे जीवन जगणे असह्य होईल. स्त्रियांवरील बलात्काराच्या संख्येत वाढ होईल.

### ५) लैंगीक आजारात वृद्धी :—

अनेक पुरूषांशी किंवा अनेक स्त्रियांशी आलेल्या शारिरीक संबंधातून एडस् उत्पन्न होतो तशाच किंवा त्याहीपेक्षा भयंकर रोगाची निर्मिती अनेक पुरूषांनी स्त्रियांशी शारिरीक संबंध ठेवल्यामुळे निर्माण होईल.

### ६) आईचे अस्तित्व नश्ट होईल :—

एकीकडे स्त्रियांचे कमी होणारे प्रमाण लग्नास मुलगी उपलब्ध नसणे, तर दुसरीकडे बहुपतीत्व पद्धत यामुळे आईपणाचे अस्तित्व नष्ट व्हायला वेळ लागणार नाही.

### उपाययोजना

1)सामाजिक मानसीकतेत बदल करणे आवश्यक बनले आहे.
2)समाजप्रबोधनातून या प्रकारास आळा घालणे.
3)प्रचलीत आणि छुप्या पद्धतीने होत असलेल्या हुंडा पद्धतीवर बंदी आणणे.
4)गर्भलिंग चाचणी करणाऱ्या डॉक्टरांवर कडक कार्यवाही व्हावी जेणेकरून इतर डॉक्टर असा प्रकार करण्याचा प्रयत्नही करणार नाही.
5)कायदे राबविणाऱ्या यंत्रणेत आमुलाग्र बदल करणे.
6)मुलीच्या जन्माला प्रोत्साहन देणाऱ्या विशेष योजना राबविणे.
7)प्रसार माध्यमांद्वारे लोकांना माहिती देणे.
8)पथनाट्य, एकांकीका, आरोग्य शिबीराच्या माध्यमातून समाजाचे प्रबोधन करावे.

### निष्कर्ष :—

स्त्रीभ्रूणहत्येसाठी कोणतेही एकच कारण जबाबदार नाही. विभिन्न आर्थिक स्तरातील, शैक्षणिक स्तरातील, सामाजिक मानसीकतेतील कुटूबांत वेगवेगळी कारणे कारणीभूत ठरतात. तसेच कोणत्याही एकाच उपायाचा अवलंब करून होणार नाही तर स्त्री—पुरूष विषमता कमी करून सामाजिक राजकीय व आर्थिक लोकशाही प्रस्थापित करावी लागेल. मुलीची संख्या जर अशीच घटत राहिली तर भयंकर सामाजिक दुष्परिणाम निर्माण होतील. ही गोष्ट लक्षात घेऊन प्रत्येक स्तरावर प्रबोधन करण्याची गरज आहे. यासाठी स्त्रीसंघटना सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, संघटनांनी सहभागी होऊन एकत्रितपणे जनजागृती अभियान अधिक तीव्र करण्याची गरज आहे. समाजप्रबोधन, विविध आर्थिक योजना व कायद्याचा धाक अशा तिन्ही स्तरावर शासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. करण्यात येणाऱ्या प्रयत्नावरच स्त्रीभ्रूणहत्या निवारणाचे भविष्य अवलंबून आहे.

### संदर्भ सूची :—

1) लोकराज्य मासीक सप्टेंबर 2011
2) IBID
3) स्त्रीभ्रूणहत्या (कारणे व उपाय) संपादक हेमराज शाह
4)Female Foeticide in India a moving Trend B. K. Swan, Pradeep Meshram, Ashok Borkar
5) स्त्रीभ्रूणहत्या एक सामाजिक समस्या डॉ. व्ही. वाय सोनावणे, प्रा. जी. एम. उपाडे
6) WWW. Facebook.com/ Ajay Wadate
7) स्त्रीभ्रूणहत्या (कारणे व उपाय) संपादक हेमराज शाह
8) महिलांच्या मानवाधिकारांचे उल्लंघन आशा खांडेकर, गवई.



**Ku.Gita Vitthal Meshram**

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org